जीवनाकडे ...

पश्चिम क्षितिजावर
माझ्या सावलीला
ऊन लागणार नाही
असं वाटलं होतं
म्हणून तर भर, भर
चालत गेलो,
विसरून सूर्याला ...
वाटलं विरताहेत
श्रांत पाऊलं
संध्या छायेत
पण थबकलो किंचित
तर सावली एकदम
हरवून गेली
संभ्रमित होत
सहज पाहिलं आभाळाकडं ...
सूर्य नुकताच माथ्यावरती
आला होता ...
तो कलू नये
पश्चिमेकडं
म्हणून मग मी ...
सूर्यापेक्षाही अधिक वेगानं ...
चालू लागलो
जीवनाकडे ...

१२ मे १९९३

– जयंतकुमार त्रिभुवन
('साहेर छाया' या काव्यसंग्रहातून)